# सहकारी अधिकारी-(प्रथम श्रेणी), सहकारी संस्था, जव्हार तालुका, जिल्हा- पालघर
## (अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाडा तालुका, जिल्हा- पालघर).
## यांचे कार्यालय.

मा. अपर जिल्हाधिकारी कार्यालय, इमारत, तळ मजला, शासकीय विश्राम गृहासमोर, जव्हार वाडा रोड, जव्हार, जिल्हा- पालघर.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अ (ब-१)(दोन) अंतर्गत आदेश.

जा. क्र. सअ-(प्रश्रे)/जव्हार/क. ७७ (अ)/ ५३ /सन २०१७
जव्हार, जिल्हा- पालघर, दि.- ११ जुलै, २०१७

वाचावे- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) (दोन) मधील तरतूद.
२) संस्थेचे सचिव यांचेकडील दि.- १-७-२०१७ रोजीचे पत्र.

ज्याअर्थी दाभेरी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था म., दाभेरी, तालुका- जव्हार, जिल्हा- पालघर (यापुढे संस्था असे वाचावे), ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अंतर्गत नोंदणी क्रमांक- टीएनए/जेएचआर/आरएसआर/(एसआर)/६०९/सन १९९०, दि.- २०-९-१९९० अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असून, ती या कार्यालयाच्या अखत्यारीत येते आणि,

ज्याअर्थी सदर संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे) व त्याखालील नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे) तसेच संस्थेचे नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेली परिपत्रके यानुसार चालविले जाणे आवश्यक आहे आणि,

ज्याअर्थी संस्थेचे सचिव यांनी उपरोक्त वाचावे क्र.- २ चे पत्रान्वये संस्थेच्या विद्यमान व्यवस्थापक समितीचे बहुतांश सदस्य, संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे थकबाकीदार झाल्याने व्यवस्थापक समिती सदस्य म्हणून यापुढे काम करण्यास अपात्र ठरल्याने व व्यवस्थापक समितीची गणपूर्ती होत नसल्याने, दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, शाखा जव्हार या बँकेने संस्थेस अद्याप खरीप हंगाम २०१७ करीता कर्ज मंजूर केले नसल्याने संस्थेच्या खरीप हंगाम २०१७ करीता कर्जवाटपात अडचण निर्माण झाल्याचे कळविले आहे व नवीन समिती गठीत होईपर्यंत दैनंदिन कामकाज करण्याकरीता प्राधिकृत अधिकारी किंवा त्रिसदस्सीय समितीची नेमणूक करण्याची विनंती केलेली आहे आणि,

ज्याअर्थी संस्थेचे संपूर्ण कामकाज ठप्प होऊन व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झालेली आहे.

त्याअर्थी संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी तात्काळ समिती / प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे माझे मत झाल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१)(दोन) नुसार कारणे दाखवा नोटीस देण्याची आवश्यकता नाही अशी माझी खात्री झालेली असल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

### -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) (दोन) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी विजय पाटील, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाडा तालुका, जिल्हा- पालघर, दाभेरी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था म., दाभेरी, तालुका- जव्हार, जिल्हा- पालघर या संस्थेचे सचिव यांनी केलेल्या विनंतीनुसार पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक झालेने, संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी संस्थेच्या खालील तीन सदस्यांची प्राधिकृत समिती नियुक्त करीत आहे.

(१) श्री. धनजु सोमा भोरे. - अध्यक्ष.

(२) श्री. सलीम चिमा मोरघा. - सदस्य.

(३) श्री. श्रावण गोविंद वाघला. - सदस्य.

नवनियुक्त प्राधिकृत समितीने संस्थेच्या दप्तराचा, मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच त्यांनी पदभार घेतल्यापासून सहा महिन्यात नवीन समितीची निवडणूक घेऊन नवीन समितीने पदभार घेण्याचे दृष्टीने आवश्यक व्यवस्था करावी.

सदरचा आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) (दोन) अन्वये आज दि.- ११/७/२०१७ रोजी माझी स्वाक्षरी व शासन मुद्रेसह निर्गमीत केला असे.

(विजय पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वाडा तालुका,
जिल्हा- पालघर.

प्रति,

१. सचिव, दाभेरी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था म., दाभेरी, तालुका- जव्हार, जिल्हा- पालघर.

२. सर्व सदस्य (नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी मंडळ), दाभेरी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था म., दाभेरी, तालुका- जव्हार, जिल्हा- पालघर.

३. शाखाधिकारी, दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जव्हार शाखा, जिल्हा- पालघर.

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदर संस्थेचे बँक खाते तात्काळ प्राधिकृत अधिकारी मंडळाच्या नावे वर्ग करण्यात यावे.

प्रत- मा. जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, पालघर यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वाडा तालुका,
जिल्हा- पालघर.

Scanned by CamScanner